# कास पठारावरील 'कवला' विद्यापीठात फुलला!

## पश्चिम घाटातील नामशेष होणाऱ्या यादीत समावेश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पानथळ जागेतील गवतात वाढणारी, फुलणारी 'कवला' (स्मिथिया हिर्सुता) ही वनस्पती कास पठाराप्रमाणे शिवाजी विद्यापीठातही फुलली आहे. पश्चिम घाटातील नामशेष होत जाणाऱ्या वनस्पतींच्या यादीत या वनस्पतीचा समावेश आहे.

स्मिथिया हिर्सुता नावाने ओळखले जाणारे हे गवत फुल आहे. याच्या नावातील स्मिथिया हे संशोधक 'जेम्स एडवर्ड स्मिथ यांच्या नावावरून घेण्यात आले आहे. त्याच्या खोडावर केसासारखी रचना दिसते, म्हणून पुढे हिर्सुता जोडले गेले. मराठीमध्ये कवळा किंवा कवला नावाने हे फूल ओळखले जाते. भारताबरोबर ते चीन, जपान, मलेशिया, उत्तर ऑस्ट्रेलिया देशात आढळते. हे झाड साधारण १५ ते ९० सेंटीमीटरपर्यंत हळूहळू वाढते. इतर फुलांबरोबर कासच्या पठारावर ही फुले मोठ्या प्रमाणात आढळतात. पिवळ्या धमक रंगांच्या फुलांमध्ये लाल रंगाचा आकर्षक ठिपका असतो. त्यामुळे फुलांचे सौंदर्य खुलून दिसते. त्यामुळे ती मिकी माऊससारखी भासतात. त्यांना 'मिकी माऊस फ्लॉवर्स' किंवा 'डोनाल्ड डक फ्लॉवर्स' असेही म्हणतात. फुले फुलल्यावर मधमाशांचा फुलांवर मुक्त संचार सुरू होतो. जुलैच्या अखेरीस ऑगस्ट-सप्टेंबरपर्यंत फुलांचे दर्शन घडते.

> कवला हा गवताचा प्रकार आहे. कासच्या पठारावर फुलणारी फुले विद्यापीठातही फुलतात. एक वर्षाआड यांचा बहर चांगला येतो. ऑगस्ट-सप्टेंबरमध्ये ही फुले मोठ्या प्रमाणात फुललेली असतात. ही दुर्मीळ वनस्पती असून याचे संवर्धन करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.
>
> **- डॉ. व्ही. एन. शिंदे,**
> उपकुलसचिव, उद्यान विभाग



ऊन कलायला लागले, की 'कवला'ची फुले व पाने मिटू लागतात. ती दुसऱ्या दिवशी पुन्हा उमलतात. लाजाळूसारखी तीन ते चार पर्णिकांच्या जोड्यांची संयुक्त पाने असतात. पानांतून वर कळ्यांचा झुपका येतो. एक किंवा जास्त फुले एकाच वेळी फुलतात. हा फुलांचा बहर दोन ते तीन आठवडे असतो. नंतर शेंगा तयार होतात आणि त्या वाळून फुटतात. त्यातून पडलेल्या बियांपासून पुन्हा पुढच्या वर्षी रोपे उगवतात.

# डॉ. आलोक जत्राटकर यांची निवड



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांची पब्लिक रिलेशन्स कौन्सिल ऑफ इंडिया या राष्ट्रीय संस्थेच्या पश्चिम विभागाच्या सहसचिव पदावर निवड करण्यात झाली आहे. पीआरसीआय-पश्चिम विभागाच्या नूतन कार्यकारिणीची घोषणा नुकतीच संस्थेच्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे सरचिटणीस यू. एस. कुट्टी यांनी ऑनलाईन पद्धतीने केली. त्यामध्ये पश्चिम विभागाच्या अध्यक्षपदी अविनाश गवई (पुणे) यांची, तर सहसचिवपदी डॉ. जत्राटकर यांची निवड केली. या निवडीमुळे संस्थेच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या निर्णय प्रक्रियेत थेट सहभाग नोंदविण्याची संधी डॉ. जत्राटकर यांना प्राप्त झाली आहे.

# संशोधन क्षेत्रावर कोरोना इफेक्ट

**कोरोनाच्या प्रसाराचा फटका सर्वच क्षेत्रांप्रमाणे संशोधनाच्या क्षेत्रालाही बसला आहे. गेल्या तीन दशकांपासून जगभरातील संशोधक एकमेकांना प्रत्यक्ष भेटून एकमेकांच्या मदतीने संशोधनकार्य पुढे नेत होते. परंतु, आता प्रत्यक्ष भेटीगाठी अशक्य झाल्या असून, व्हर्च्युअल भेटींमधून काही संशोधक आपले संशोधन पुढे नेत आहेत. तथापि, किमान यावर्षी संशोधनाच्या क्षेत्रात वेग वाढणे शक्य नाही, हे बहुतांश शास्त्रज्ञांनी मान्य केले असून, सध्या 'होमवर्क' करणारे शास्त्रज्ञ कोरोनाचा प्रसार कमी होताच 'फिल्डवर्क' करू लागतील.**

कोरोनाच्या जागतिक साथीमुळे सर्वच क्षेत्रांवर दुष्परिणाम झाला असून, यात संशोधनाचे क्षेत्र प्रामुख्याने प्रभावित झाले आहे. अनेक संशोधन योजना लांबणीवर पडल्या आहेत तर काही योजना ऑनलाईन सहकार्याच्या बळावर पूर्ण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. संशोधनाच्या मोठ्या प्रकल्पांचा कालावधी वाढविण्यात आला आहे. प्रवासाच्या सुविधा सुरू नसल्यामुळे आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि समन्वय कमी झाला आहे. शास्त्रज्ञ आपल्या संशोधनासाठी केवळ परदेशीच नव्हे तर देशांतर्गत प्रवाससुद्धा करू शकत नाहीत, अशी स्थिती आहे. अनेक दशके सुरू असलेल्या काही संशोधन योजना रुळावरून उतरल्या आहेत. विशेषत: अमेरिका आणि पश्चिम युरोपीय क्षेत्रात स्थिती अधिक चिंताजनक आहे. १९९१ नंतर जगभरात संशोधनाच्या क्षेत्रात परस्पर सहकार्याचा पाया अधिक भक्कम झाला होता, हे या ठिकाणी लक्षात घेतले पाहिजे. वैज्ञानिक संशोधनाला समर्पित असणाऱ्या 'नेचर' या नियतकालिकातील एका वृत्तांतानुसार, एकूण संशोधन प्रकल्पांपैकी एक चतुर्थांश प्रकल्प आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि समन्वयावर आधारित होते. या देशातून त्या देशात जाणे-येणे अतिशय सोपे झाले होते. जागतिकीकरणामुळे संशोधनावर केलेल्या आर्थिक तरतुदीचा व्यापक उपयोग होत होता. याचा फायदा विज्ञान, संशोधक आणि शास्त्रज्ञांबरोबरच समाजालाही मोठ्या प्रमाणावर होऊ लागला होता. कोरोनाकाळाच्या



## प्रासंगिक

पूर्वीच्या तीस वर्षांच्या काळात संशोधनाच्या क्षेत्राने देशा-देशांमधील सीमा पुसून टाकल्या होत्या. परदेशातील शास्त्रज्ञांच्या सहकार्याने सादर करण्यात येणाऱ्या संशोधन अहवालांच्या संख्येत ब्रिटन, अमेरिका, फ्रान्स आणि जर्मनी या विकसित देशांमध्ये दहापट वाढ झाली होती. ब्राझील, रशिया, भारत, चीन आदी देशांमध्ये ही वाढ वीसपट नोंदविली गेली. सर्वांत आश्चर्यजनक गोष्ट अशी आहे की, अमेरिका आणि चीन या देशांदरम्यान संशोधनासाठी जगात सर्वाधिक सहकार्य झाले. दोन्ही देश कोणत्याही अन्य देशांच्या तुलनेत एकमेकांशी अधिक भागीदारी करार करीत होते. परंतु, कोरोनाच्या कालावधीत या दोन्ही देशांदरम्यान मोठा तणाव निर्माण झाला आणि त्यामुळे संशोधन आणि विकासाच्या क्षेत्रावर मोठा प्रहार झाला.

संकटकाळात संशोधन सहकार्य आणि या क्षेत्रातील उत्पादकतेवर जास्त परिणाम होऊ नये यासाठी संशोधक आपापल्या परीने प्रयत्न करीत आहेत. परंतु, विशेषत्वाने विकसनशील देशांमधील संशोधन कार्यास या साथीमुळे मोठा फटका बसला आहे. ओहियो स्टेट युनिव्हर्सिटीतील संशोधक कॅरोलिन वगनेर यांच्या मते नव्वद टक्के आंतरराष्ट्रीय संशोधन प्रकल्पांमध्ये दोन किंवा अधिक देशांमधील संशोधक एकमेकांसमोर बसूनच काम करीत होते. आता हे काम अवघड आणि जोखमीचे झाले आहे. व्हर्च्युअल माध्यमातून संशोधक एकमेकांसमोर येत असले तरी व्हर्च्युअल माध्यमांमधून होणाऱ्या भेटींना प्रत्यक्ष भेटीतून होणाऱ्या देवाणघेवाणीची सर येणे अशक्य आहे, हे आपण मान्य करायला हवे.

आजच्या काळात व्हर्च्युअल संपर्क अधिक आवश्यक बनला आहे, असे जवळजवळ सर्वच शास्त्रज्ञ मानू लागले आहेत. आता यापुढील काळात जे शास्त्रज्ञ अधिक खुलेपणाने एकमेकांशी संपर्क साधतील त्यांना अधिक फायदा होईल. संकोच टाळून पुढे येण्यात आणि संशोधनाच्या कामी इतरांचे सहकार्य घेण्यातच या क्षेत्राचे हित सामावले आहे. दुसरीकडे, काही शास्त्रज्ञ सध्याच्या कालावधीचा वापर आपले ज्ञान अधिक परिपक्व आणि अचूक करण्यासाठी करीत आहेत. यापूर्वी त्यांनी केलेल्या संशोधनातील उणिवा शोधून त्या दुरुस्त करण्यात असे शास्त्रज्ञ व्यग्र आहेत. अशा शास्त्रज्ञांचे 'होमवर्क' सध्या वाढले असून, कोरोनाचा प्रसार थांबताक्षणी त्यांचे 'फिल्डवर्क' अधिक गतीने सुरू होईल. कोरोनावर प्रभावी औषध कधी शोधून काढले जाईल, याकडे संपूर्ण जगाचे आता लक्ष लागले आहे आणि ते स्वाभाविकच आहे. अन्य संशोधनांकडे जगाचे सध्याच्या काळात फारसे लक्ष नाही. संशोधनाच्या क्षेत्रात कमीत कमी यावर्षी तरी वेग वाढू शकणार नाही, हे बहुतांश शास्त्रज्ञांनी मान्य केले आहे. म्हणजेच, विज्ञानाच्या जगातील 'न्यू नॉर्मल' अजून दूरच आहे.

- **विनिता शाह**

# अंतिम सत्रांच्या प्रात्यक्षिक परीक्षा दि. १५ पासून

(पान १ वरून) बैठक घेतली. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत, राज्यमंत्री प्राजक्त तनपुरे, अप्पर मुख्य सचिव राजीव जलोटा, परीक्षेसंदर्भात गठित केलेल्या समितीचे अध्यक्ष तथा मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. सुहास पेडणेकर उपस्थित होते.

सर्वोच्च न्यायालय आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) मार्गदर्शक सूचनानुसार १५ सप्टेंबरपासून प्रात्यक्षिक परीक्षा सुरु करून ३१ ऑक्टोबरपर्यंत निकालासह परीक्षा प्रक्रिया पूर्ण करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषद आणि विद्यापीठाच्या परीक्षा मंडळासमोर ठेवून दोन दिवसांत शासनास कळवावे व राज्य आपत्कालीन प्राधिकरणाची बैठक मंगळवारी घेण्यासंदर्भात मुख्यमंत्री ठाकरे यांना विनंती करावी, अशी सूचना राज्यपालांनी केली. परीक्षा कोणत्या पद्धतीने घ्यायची, बहुपर्यायी प्रश्नासह स्वरुप किंवा अन्य काही याचा निर्णय विद्यापीठांनी व्यवस्थापन परिषद आणि परीक्षा मंडळामध्ये परीक्षेसंदर्भात गठित केलेल्या समितीचा अहवाल सादर करुन परीक्षा पद्धती निवडावी. मात्र, ऑफलाईन पद्धतीने परीक्षा घेण्याचा पर्याय अपवादात्मक स्थितीच घ्यावा, अशी सूचनाही राज्यपालांनी केली.

३१ ऑक्टोबरपर्यंत सर्व परीक्षांचे निकाल लावण्याची जबाबदारी कुलगुरु आणि विद्यापीठांची आहे. एटीकेटी आणि बॅकलॉगच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षाही अशाच सोप्या पद्धतीने घेण्याचा प्रयत्न असेल, असे मंत्री उदय सामंत यांनी पत्रकारांना सांगितले.

# घरूनच देता येईल परीक्षा

## राज्यपाल अनुकूल; प्रात्यक्षिक परीक्षा १५ पासून

**सकाळ वृत्तसेवा**

**अंतिम वर्ष परीक्षा**

मुंबई, ता. ३ : अंतिम वर्षाच्या लेखी परीक्षा ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात सुरू होतील, तर निकाल ३१ ऑक्टोबरपर्यंत जाहीर होणार असून १५ ते ३० सप्टेंबरपर्यंत प्रात्यक्षिक परीक्षा होतील, असे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी स्पष्ट केले. विद्यार्थ्यांना घरातून परीक्षा देण्यास राज्यपालांनी मंजुरी दिल्याने कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. अंतिम वर्षाची परीक्षा विद्यार्थ्यांना त्रास होणार नाही याची काळजी घेत सोप्या पद्धतीने होणार असल्याचे सामंत यांनी सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्य सरकारने अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्यासाठी बैठकांचे सत्र चालवले आहे.

**पान ७ वर »**



**परीक्षा घेण्यासाठी वेगवेगळे पर्याय समोर आहेत. त्यावर चर्चा सुरू असून सोपी पद्धत वापरण्यावर एकमत झाले आहे. परदेशात जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे काय करायचे याबाबतही आम्ही चर्चा करून निर्णय घेऊ. राज्यपाल आणि आमच्यामध्ये विसंगती नाही.**

**- उदय सामंत,**
उच्च व तंत्र शिक्षणमंत्री

# अंतिम वर्ष परीक्षा घरातून देता येणार

**(पान १ वरून)** जावे लागणार नाही, यासाठी आम्ही प्रयत्न करणार असल्याचे सामंत म्हणाले. विद्यार्थ्यांनी मनात कोणताही संभ्रम न ठेवता अभ्यासाला लागावे, असे सांगताना त्यांनी अंतिम वर्षाच्या लेखी परीक्षा ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यापासून सुरू होण्याची शक्यता असल्याचे स्पष्ट केले. परीक्षेची तारीख अद्याप निश्चित झाली नसली, तरी लवकरच वेळापत्रक जाहीर करण्यात येईल, असे सामंत म्हणाले.

सर्वोच्च न्यायालय आणि विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) मार्गदर्शक सूचनांनुसार १५ सप्टेंबरपासून परीक्षा सुरू करून ३१ ऑक्टोबरपर्यंत निकालासह परीक्षा प्रक्रिया पूर्ण करण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. तसेच समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषद आणि विद्यापीठाच्या परीक्षा मंडळासमोर ठेवून दोन दिवसांत शासनास कळवावे आणि राज्य आपत्कालीन प्राधिकरणाची बैठक घेण्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांना विनंती करावी, अशी सूचना राज्यपालांनी केली.

# घरूनच देता येईल परीक्षा

» पान १ वरून

या परीक्षा घेण्याबाबतच्या चर्चांवर उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी पडदा टाकला. राज्यातील अंतिम वर्षाच्या परीक्षांसंदर्भात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत आणि कुलगुरू समितीची बैठक पार पडली.

या बैठकीत अंतिम वर्षाच्या परीक्षा कशा घ्यायच्या यावर चर्चा झाली. त्यानंतर १५ ते ३० सप्टेंबरपर्यंत प्रात्यक्षित परीक्षा होतील. तर ३१ ऑक्टोबरपर्यंत निकाल जाहीर होईल, असे सामंत यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना या परीक्षा घरी बसून देता येणार आहेत. लेखी परीक्षेप्रमाणे प्रॅक्टिकल परीक्षेलाही त्यांना महाविद्यालयात जावे लागणार नाही, यासाठी आम्ही प्रयत्न करणार असल्याचे सामंत यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी मनात कोणताही संभ्रम न ठेवता अभ्यासाला लागावे, असे सांगताना त्यांनी अंतिम वर्षाच्या लेखी परीक्षा ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात होईल, असे स्पष्ट केले. परीक्षेची तारीख अद्याप निश्चित झाली नसली तरी लवकरच विद्यापीठांमार्फत वेळापत्रक जाहीर करण्यात येईल, असे सामंत यांनी सांगितले.

परीक्षा घेण्यासंदर्भातील निर्णय कुलगुरू घेणार असून, त्यासंदर्भात कुलगुरूंची समिती आपला अहवाल गुरुवारी दुपारी १२ वाजेपर्यंत सादर करणार होती. परीक्षा कशा घ्यायच्या हा निर्णय कुलगुरू आणि विद्यापीठांनी घ्यायचा होता. परीक्षा घेण्यासाठी वेगवेगळे पर्याय समोर आहेत. त्यावर चर्चा सुरू असून सोपी पद्धत वापरण्यावर एकमत झाले असल्याचे सामंत म्हणाले. परदेशात जाणाऱ्या विद्यार्थ्यांचे काय करायचे याबाबतही आम्ही चर्चा करून निर्णय घेऊ. राज्यपाल आणि आमच्यामध्ये विसंगती नाही. आम्ही सर्वजण एकमेकांच्या संपर्कात असून राज्यपालांशी चर्चा सकारात्मक झाली. फेरपरीक्षार्थींच्या परीक्षा देखील सोप्या पद्धतीने होणार असल्याचे ते म्हणाले. कोरोनाची परिस्थिती लक्षात घेऊन शैक्षणिक वर्ष सुरू करण्यासंदर्भात निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी सांगितले.

अंतिम वर्षाच्या परीक्षेसंदर्भात राज्यपालांच्या अध्यक्षतेखाली राज्यपालांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीला उदय सामंत यांच्यासहराज्यमंत्री प्राजक्त तनपुरे,अप्पर मुख्य सचिव राजीव जलोटा,परीक्षेसंदर्भात स्थापन केलेल्या समितीचे अध्यक्ष तथा मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. सुहास पेडणेकर उपस्थित होते.

## राज्यपालांची सूचना

समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषद आणि विद्यापीठाच्या परीक्षा मंडळासमोर ठेवून दोन दिवसांत शासनास कळवावे आणि राज्य आपत्कालीन प्राधिकरणाची बैठक मंगळवारी घेण्यासंदर्भात मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना विनंती करावी अशी सूचना राज्यपालांनी केली.

# अंतिम वर्ष परीक्षा घरातून देता येणार




## ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात कार्यक्रम

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

अंतिम वर्षांच्या लेखी परीक्षा ऑक्टोबरच्या पहिल्या आठवड्यात घेण्यात येतील. ३१ ऑक्टोबरपर्यंत निकाल जाहीर होईल तसेच १५ ते ३० सप्टेंबरपर्यंत प्रॅक्टिकल परीक्षा होतील, असे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी गुरुवारी माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले. विद्यार्थ्यांना या परीक्षा घरी बसून देण्यास राज्यपाल सकारात्मक असून, यामुळे विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे, असेही सामंत म्हणाले.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने परीक्षा न घेण्याचा घेतलेला निर्णय आणि 'यूजीसी'ने परीक्षा घेणे बंधनकारक केल्याने मोठा वादंग निर्माण झाला होता. सर्वोच्च न्यायालयाने परीक्षा घेण्यासंदर्भात दिलेल्या निर्णयानंतर अंतिम वर्षांच्या परीक्षांसंदर्भात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत आणि कुलगुरू समितीची बैठक पार पडली.

या बैठकीत अंतिम वर्षांच्या परीक्षा कशा घ्यायच्या, यावर चर्चा झाली. १५ ते ३० सप्टेंबरपर्यंत प्रॅक्टिकल परीक्षा होतील. ३१ ऑक्टोबरपर्यंत निकाल जाहीर होईल, असे सामंत यांनी सांगितले. विद्यार्थ्यांना या परीक्षा घरी बसून देता येणार आहेत. लेखी परीक्षेप्रमाणे प्रॅक्टिकल परीक्षेलाही त्यांना महाविद्यालयामध्ये पान २ वर ▶

# राज्यात अंतिम सत्रांसाठी दि. १५ पासून प्रात्यक्षिक परीक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** विद्यापीठांच्या अंतिम सत्रांसाठीच्या परीक्षांसाठी निकालासह संपूर्ण प्रक्रिया ३१ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करावी, तसेच सर्व विद्यापीठांनी १५ सप्टेंबरपासून प्रात्यक्षिक परीक्षांना सुरुवात करावी, असे निर्देश राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी गुरुवारी सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंना दिले.

कृषी, अकृषी विद्यापीठांच्या सर्व कुलगुरूंची ऑनलाईनच्या माध्यमातून राज्यपालांनी राजभवनवर (पान ८ वर)